वित्त विभागाकरीता २२ नवीन संगणक प्रिंटर खरेदी करण्यास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक :- सीओएम-२०१९/प्र.क्र.०८/संगणक कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २८.०८.२०१९

संदर्भ - १) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (खुद्द) खरेदी समिती बैठकीचे इतिवृत्त, दि.१४.०८.२०१९.
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.२४.०८.२०१७.

शासन निर्णय :-

वित्त विभागात सध्या वापरात असलेल्या प्रिंटर्सचा वॉरंटी कालावधी संपूष्टात आलेला आहे. सदर वॉरंटी कालावधी संपुष्टात आलेले प्रिंटर्स वारंवार नादुरूस्त होत आहेत. ही वस्तुस्थिती विचारात घेता, विभागाच्या कार्यालयीन कामकाजासाठी प्रिंटर्स खरेदी करण्याचा निर्णय विभागाव्दारे घेण्यात आला आहे. सदर प्रिंटर्स खाली नमुद केलेल्या Configuration प्रमाणे खरेदी करण्यात येणार आहेत.

Component	Specification	Quantity
Printing Technology	Laser	22
Cartridge Technology	Composite	
Type of Printing	Mono	
Paper Size	A4	
Memory (MB)	128	
Duplexing Feature	Yes	
Duplex print Speed	15	
Network Connectivity	Yes	
USB Port	Yes	
Duty Cycle/month (No of Prints)	30000	

२. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक -विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७/०४/२०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-१, उपविभाग-२, अनुक्रमांक-२७-अ, नियम क्रमांक-७६ अन्वये नवीन संगणक यंत्रणा खरेदी करणे आणि श्रेणीवाढ करण्यास मंजूरी देणे यासाठी पूर्ण अधिकार प्रशासकीय विभागाला असून सदर अधिकारानुसार तसेच मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (खुद्द) खरेदी समितीच्या दि.१४/०८/१९ च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३ सदर प्रिंटर खरेदीची प्रक्रिया उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४/०८/२०१७ नुसार केंद्रशासनाने विकसित केलेल्या गर्व्हमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवरून राबविण्यात आलेली आहे. जेम पोर्टलच्या निविदा पध्दतीनुसार L1 निविदाकार म्हणून M/s Galaxy Office Automation Pvt.Ltd. हे निविदाकार पात्र ठरलेले आहेत. २२ प्रिंटरची एकूण किंमत त्यांनी रूपये ३,१९,०००/- इतकी नमुद केली आहे. सदर L1 निविदाकाराकडून प्रिंटर खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. या कारणाकरीता होणारा एकूण खर्च रूपये ३,१९,०००/- हा मागणी क्रमांक जी-४, २०५२, सेक्रेटरीएट सर्वसाधारण सेवा, (००)(०१) वित्त विभाग (२०५२ ०२३२), "१७ संगणकावरील खर्च" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८२८१६४४४२९२०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vinayak Arvind Dhotre

Digitally signed by Vinayak Arvind Dhotre
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=857ec0d4ffa11afd448c1db99e6d5447265170ecc87e6e5c74be1217bec62ba9, serialNumber=eed64ff5f3811d4c3522d8713ed9a9090e2a4f33552eea2364d17d782c35e926, cn=Vinayak Arvind Dhotre
Date: 2019.08.28 16:52:51 +05'30'

(वि.अ.धोत्रे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई.
३. रोख शाखा, वित्त विभाग, मंत्रालय ,मुंबई.
४.निवडनस्ती (संगणक कक्ष) वित्त विभाग,